FORM-1 A N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई पोलीस ठाणे ला.प्र.वि. पहिली खबर क्र. ३५ वर्ष २०१८ दिनांक ०८/११/१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८ कलमे Sections ७
(ii) अधिनियम Act कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार तारीख पासून ०८/११/१८ वेळ १६.०० तारीख पर्यंत ०८/११/१८ वेळ
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख ०८/११/१८ वेळ १६.००
Information received at P.S. Date Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ०१/१९ तारीख ०८/११/१८ वेळ ००.५४ वा
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी लेखी/तोंडी Written/Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा १४ कि.मी. उत्तर चौकी/बीट/दुरक्षेत्र नाव व क्र.
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव वस्तु व सेवाकर भवन ठिकाणाचे नंबर G विंग, ४ था माळा गल्ली रस्त्याचे नाव बी.के.सी. रोड
Address of Occurence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण एम.एम.आर.डी.ए. गाव पोस्ट तालुका बांद्रा (पु) जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव तालुका जिल्हा राज्य
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name आकाश झा (b) वडीलाचे/पतीचे नाव संजय झा.
Father's /Husband's Name
(c) जन्मतारीख व वय ०७/०३/१९९५, २४ वर्षे (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९८६००२५०६६.
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक दिल्याचा दिनांक दिल्याचे ठिकाण (f) व्यवसाय खिडकीकर सल्लागार
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste ब्राम्हण, जनजात Sub-Caste
(h) पत्ता : ओकुनिसा गल्ली/सर्वे नं. घर/नाव नंबर २ फोन/मो. नंबर पॅन नं. वोटर्स नं.
Address : Ward House/Name No. Phone/M. No. Par No. Card No.
रस्त्याचे नाव केतकीपाडा जवळचे प्रसिद्ध ठिकाण गाव पोस्ट पो. स्टे.
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका दहिसर (पु) जिल्हा मुंबई राज्य महाराष्ट्र सध्याचा पत्ता वरील प्रमाणे
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपींचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

आरोपी लोकसेविका माधुरी अनिल चव्हाण, वय ५३ वर्षे, विक्रीकर अधिकारी
वस्तु व सेवाकर भवन, बी.के.सी. रोड, बांद्रा (पु) मुंबई
रा.ठि. १७/५/३, आझाद नगर नं-१, अपना बाजार समोर, अंधेरी (पु) मुं.

Scanned by CamScanner

यातील फिर्यादी आकाश संजय झा, वय २४ वर्षे, धंदा - विक्रिकर सल्लागार यांची फिर्याद स्वतंत्र पानावर संगणीकृत करण्यात आली असून तिचा गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे. ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष,

(अमोल शिंदे)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई विभाग

NER OF POLICE ... ANTI-CORRUPTION BUREAU MUMBAI

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ............
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ............
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फि" यांचे ग्राहकांचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रद्द न करण्याकरीता व फि" चे आईचे रजिस्ट्रेशन रद्द करण्याकरीता असे एकुण रु. १५०००/- रक्कमेची आलोसे माधुरी चव्हाण यांनी मागणी केली. त्यातील फि" कडे पुरेशी रक्कम नसल्याने आलोसे यांनी फि" यांचे ग्राहकांचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रद्द न करण्यासाठी रु. ५०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती रु. ४०००/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणून कलम ७ भ्र.प्र. अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो.नि. अमोल शिंदे, लाप्रवि, मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ............ Rank............ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P.S ............ District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... अमोल शिंदे
पदनाम Rank ... पो.नि., लाप्रवि, मुंबई
तपासिक अं. चा कोड. क.
Posting
Code No. of I.O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............
1. Date and time of submitted to the Court.

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to. 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned by CamScanner

फिर्याद दिनांक ०७/११/२०१९

श्री. आकाश संजय झा वय २४ वर्षे, धंदा – कर सल्लागार रा.ठि.– रुम न.१, खैरुनिसा चाळ, केतकीपाडा, दहिसर ईस्ट, मुंबई ६८ मो.नं. ९८७००१५०६६

———०००———

मी वर नमूदप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझी आई शोभा झा वय ४५ वर्षे, बहीण नामे तनुजा झा वय १९ वर्षे यांचे सह रहात आहे. माझे वडील नामे संजय झा वय ५० वर्षे हे रहाते गावी बिहार येथे रहात आहेत. माझे शिक्षण बी.कॉम पर्यन्त शिक्षण मुंबई मध्ये झालेले आहे. मी कर सल्लागार म्हणुन व्यवसाय करतो तसेच मी माझेकडे येणा–या ग्राहकांचे जी.एस.टी. टॅक्स, इंन्कम टॅक्स रिटर्न इत्यादी सेवावस्तु कर फाईल रिटर्न करण्याचे काम करतो. सदरचे काम मी ऑन लाईन पध्दतीने करतो

माझे ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर यांनी दि.०१/११/२०१९ कळविले की, त्यांनी सेवा वस्तु कराची रिटर्न फायलिंग केली नसुन त्याबाबत त्यांचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद होणार आहे असे बांन्द्रा येथील वस्तु व सेवा कर कार्यालयातुन श्रीमती माधुरी चव्हाण यांनी सांगुन त्यांनी तात्काळ कार्यालयामध्ये येण्यास सांगितले.

त्यानंतर मी दि.०४/११/२०१९ रोजी वस्तु व सेवाकर भवन ४ था माळा, ए विंग, बी.के.सी. रोड बांन्द्रा पुर्व, मुंबई येथे जावुन श्रीमती माधुरी चव्हाण, विक्रीकर अधिकारी यांना भेटलो असता माझे ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर यांचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद न करण्याकरीता व माझी आईचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद करण्याकरीता सांगितले. तेव्हा माधुरी चव्हाण यांनी मला सांगितले की, ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर व आईने मासिक वस्तु सेवा कराची फायलिंग केलेली नाही. त्यामुळे सदरचे जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद करण्यात येईल. तसेच सदरबाबत ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर यांचे रजिस्ट्रेशन रदद न करण्याकरीता पाच हजार व आईचे रजिस्ट्रेशन रदद करण्याकरीता दहा हजार असे एकूण रु. १५,०००/– रक्कमेची विक्रीकर अधिकारी श्रीमती माधुरी चव्हाण यांनी माझेकडे लाच म्हणुन मागणी केली.

सदरची रक्कम ही विक्रीकर अधिकारी श्रीमती माधुरी चव्हाण यांना माझी दयावयाची ईच्छा नसल्याने मी दि.०६/११/२०१९ रोजी सांय. १७.०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे लेखी तक्रार अर्ज सादर केला. सदर तक्रारीच्या अनुषंगाने स.पो.आ. माने व पो.नि. अमोल शिंदे यांनी मला ला.प्र.विभागाचे वरिष्ठांकडे समक्ष हजर केले व माझे तक्रारीवर पुढील योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले असता, पो.नि. अमोल शिंदे व सपोआ माने यांनी मला दि.०७/११/२०१९ रोजी मी दिलेल्या तक्रारीच्या पडताळणीकामी ला.प्र.वि. वरळी, मुंबई कार्यालयास बोलविले.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने मी दि.०७/११/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक मुंबई विभागाचे पो.नि. अमोल शिंदे, स.पो.आ. माने यांचे समक्ष हजर झालो. पो.नि. शिंदे यांनी मी दि.०६/११/२०१९ रोजी लोकसेवका विरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रारीची लगेच पडताळणी करण्याबाबत माझेकडे विचारणा केली मी होकार देवुन पो.नि. शिंदे यांनी मला माझे तक्रारीची दोन शासकिय पंचासमक्ष पडताळणी कारवाई घेण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच सदर पडताळणीच्यावेळी लोकसेवक व माझेमधील संभाषण हे माझे बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येवुन ध्वनिमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांचेसह लोकसेवक श्रीमती माधुरी चव्हाण यांनी माझेकडे केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भातील कारवाई सुरु करण्यात आली. माझे सोबत लाचेच्या मागणी संदर्भातील पडताळणी कारवाईच्यावेळी मी व पंच श्रीमती पुनम सुर्यकांत मेस्त्री यांचेसह लोकसेवक माधुरी चव्हाण यांना वस्तु व सेवाकर ४ था माळा, ए विंग, बी.के.सी. बांन्द्रा, पुर्व मुंबई यांच्या कार्यालयातील कक्षामध्ये जावुन भेटलो. त्यावेळी त्यांनी माझे कामाबाबत चर्चा केली व माझे ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर यांचे रजिस्ट्रेशन रदद न करण्याचे कामाचे रु. ५०००/– व आईचे रजिस्ट्रेशन रदद करण्यासाठी रु. १०,०००/– रक्कमेची मागणी केली. परंतु इतकी रक्कम माझेकडे नसल्याचे सांगितले. म्हणुन मी अरुमुगराज सेल्वराज नाडर याच्या कामाचे पाच ऐवजी रु ४०००/– रक्कमेची व आईच्या कामाचे दहा ऐवजी आठ हजार रक्कमेची मागणी केली. त्यावेळी मी माझेकडे ऐवढे पैसे नसल्याचे लोकसेवक माधुरी चव्हाण यांना सांगुन माझे ग्राहक अरुमुगराज सेल्वराज नाडर यांचे कामाचे रु.४०००/– रक्कम एटीएम मधुन घेवुन येतो असे सांगितल्यावर लोकसेवक यांनी



Scanned by CamScanner

मला एटीएम मधुन घेवुन ये असे सांगितल्यावर मी त्यांच्या कार्यालयातुन बाहेर येवुन परत पोलीस वाहनाजवळ सपोआ माने व पो.नि. शिंदे यांना लोकसेवक माधुरी चव्हाण यांनी रु. ४०००/— रक्कमेची मागणी केली असल्याचे सांगितले. सपोआ माने, पो.नि. शिंदे यांनी पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियानला लावलेल्या व्हाईस रेकॉर्डर मधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यावेळी लाचेच्या मागणीबाबत खात्री झाल्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरविले. लाचेसाठी माझेकडे बचतीमधील रु. ४०००/— इतकी शिल्लक असलेली रक्कम पो.नि. शिंदे यांना सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी दिले. सदरच्या रक्कमेस पोलीस चालक श्री हाटकर यांनी पोलीस वाहनामध्ये अँन्थ्रॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच मला लोकसेवक श्रीमती माधुरी चव्हाण यांनी लाचेची रक्कम स्विकारुन नंतर इशार म्हणुन सापळा पोलीस पथकास दिसेल अशा पध्दतीने डावा हात वारवांर डोक्यावरुन फिरवण्याबाबत सुचना दिल्या. त्यांनतर मी व पंच श्रीमती पुनम सुर्यकांत मेस्त्री असे लोकसेवक श्रीमती माधुरी चव्हाण यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक श्रीमती माधुरी चव्हाण यांच्या कार्यालयाच्या आवारात सापळा पथक हजर होते. लोकसेवक माधुरी चव्हाण यांच्या कार्यालयात आल्यावर मी त्याच्या कक्षात गेलो असता आमच्या मध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. लोकसेवक माधुरी चव्हाण यांनी माझे ग्राहक नामे अरुमुगराज सेल्वराज नाडर यांचे जी. एस.टी. रजिस्ट्रेशन रदद न करण्यासाठी मागणी केलेली रक्कम हि " ह... ठेव.... फाईलमध्ये " असे म्हणुन त्यांच्या समोर असलेल्या टेबलावर गुलाबी रंगाच्या फाईलकडे ठेवण्याचा इशारा केला. त्यावर मी माझे शर्टाच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु. ४०००/— ही गुलाबी रंगाच्या फाईलमध्ये ठेवली त्यावर लोकसेवक माधुरी चव्हाण यांनी मला जी.एस.टी. रजिस्ट्रेशन फायलिंग तारखेची मुदत वाढवुन देण्याबाबतची नोटीस दिली व त्यावर माझी स्वाक्षरी घेतली. त्यानंतर मी व पंच श्रीमती पुनम मेस्त्री यांचेसह लोकसेवक याच्या कक्षाच्या बाहेर येवुन ४ थ्या मजल्याच्या लिफ्ट शेजारी उभ्या असलेल्या पोलीस पथकास लोकसेवकानी लाच स्विकारल्याबाबत डोक्यावर वारंवार डावा हात फिरवून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदारानी लोकसेवक माधुरी चव्हाण यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले.

दि. ०७/११/२०१९ रोजीच्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक माधुरी चव्हाण यांचेशी माझे झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले. सदर ध्वनिमुद्रीत संभाषण पो.नि. शिंदे यांनी मला ऐकवून माझे मदतीने पोलीस अंमलदार कावले यांच्या मार्फतीने त्याची प्रतिलिपी संगणकावर तयार केली. मी व लोकसेवक माधुरी चव्हाण यांचेमध्ये झालेले संभाषण ओळखुन त्याबाबत पोलीस अंमलदार कावले यांना दिलेल्या माहितीवरुन श्री कावले यांनी संभाषणासमक्ष तशी नोंद घेतली आहे.

लोकसेवक माधुरी चव्हाण यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण—घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी लोकसेवक माधुरी चव्हाण यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज जी.एस.टी. रजिस्ट्रेशन रदद न करण्याकरीता मोबदला म्हणुन माझेकडे दि.०७/११/२०१९ रोजी रु. ५०००/— इतक्या रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४०००/— रक्कम स्विकारली म्हणुन माझी लोकसेवक माधुरी चव्हाण यांचे विरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा जवाब मराठीत संगणकीकृत केला असूनतो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( अमोल शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.



Scanned by CamScanner